# यश साजरे करणे

## 1. प्रेरणा

यश साजरे केल्याने आपल्याला ठरविलेल्या ध्येयाची आणि आपण ते का ठरविले ह्याची आठवण होते. ध्येय का महत्वाचे होते हे विसरणे सोपे आहे, परंतू ते विसरल्याने त्या कार्याचा सर्व अर्थ निघून जातो. जेव्हा आपल्याला समजते की जे काम आपण करतो ते मुलांना येशू ख्रिस्ताशी संबंध जोडण्यासाठी मदत करते तेव्हा आपल्याला अधिक काम करण्यासाठी प्रेरणा मिळते.

## 2. हृदयावर लक्ष केंद्रित करा

यश साजरे केल्याने मनातील किंवा हृदयाच्या ज्या बदलांची आपण अपेक्षा करतो त्यावर लक्ष केंद्रित ठेवण्यासाठी सहाय्य मिळते. आपण निकर्ष साजरे करत असतांना, आपण मनाच्या बदलांवर सहज केंद्रित राहू आणि जगिक मूल्यांकडे आकर्षिले जाणार नाही.

## 3. कौतुक

यश साजरे केल्याने आपला पूर्ण संपूर्ण समूह चांगले कार्य सुरू ठेवण्यासाठी प्रोत्साहित होतो. ज्या स्वयं सेवकांचे कौतुक केले जाते आणि ज्यांना वाटते की त्यांच्या प्रयत्नांची दखल घेतली जाते ते मंडळीच्या पुढील कार्यासाठी किंवा प्रकल्पासाठी अधिक फलदायी होतात. एकमेकांचे कौतूक करण्यासाठी आपण सर्वच सहभागी होवू शकतो.

## 4. ऐक्य

यश साजरे केल्याने आपला समूह सकारात्मक परिणामाच्या भोवती एक होतो. जर आपल्यात काही सदस्य आहेत ज्यांना काम करणे कठिण जात आहे, तर आपण सामान्य ध्येय गाठले आहे ह्याची स्वतःला आठवण करून दिल्याने आपण अधिक एक होतो.

## 5. यश किंवा विजय

यश साजरे केल्याने आपल्या समूहाला आठवण होते की आपण यशस्वी सेवे मध्ये आहोत. लोकांना यशस्वी सेवेचा भाग व्हायला आवडते. म्हणूनच मनोबल बांधणी साठी किंवा वाढविण्यासाठी आपण ऐकमेकांना हे ज्ञान करून देवू शकतो की आपण यशस्वी सेवेत आहोत जरी - विशेषतः जरी इतर क्षेत्र असू शकतात ज्यात आपली मंडळी किंवा सेवा संघर्ष करत असेल तरी.

## 6. गती

यश साजरे केल्याने समूहाला गती मिळते. जेव्हा यश साजरे केले जाते तेव्हा, प्रत्येकाला त्याच्या एखादया विशिष्ट ध्येयापर्यंत पोहचण्याच्या क्षमतेची आठवण होते आणि हे कळते की ते मोठे ध्येय गाठण्याच्या किती जवळ आहेत.

## 7. सकारात्मक वृत्ती

यश साजरे केल्याने आपल्याला नकारात्मक ऐवजी सकारात्मकतेवर लक्ष केंद्रित करणे भाग पडते. जर तुमची

मंडळी आर्थिक मंदी मध्ये मागे गेली तरी काही यश असू शकतात ज्याचा तुम्ही आनंद साजरा करू शकता. प्रभू साठी चांगल्या गोष्टी अजूनही होत आहेत हयाची आठवण देवून तुमच्या समूहाला प्रोत्साहन दया.

## 8. मैत्री

आपल्या समूहा बरोबर यश साजरे केल्याने आपल्या समूहातील सदस्यांमध्ये मैत्री निर्माण करण्यासाठी मदत होते. त्यामूळे आपल्या बहीन भावांबरोबर अशा रितीने जुळण्यासाठी मदत होते की जे संबंध केवळ सेवेशी संबंधीत नाहीत. आपल्या समूहातील इतर सदस्यांशी अधिक वयैक्तीक संबंध जोडण्यासाठी मदत होते.

## 9. वर्तन पुष्टी

यश साजरे करणे हयात भाऊ बहीनींना विशिष्ट बक्षीस देण्याची मुभा असते. जे चांगले झाले त्या संबंधी जेव्हा आपण स्पष्ट असतो - नाव देणे, तारीख, उत्तम कल्पना आणि वेळत काम करणे किंवा वेळे नंतर करणे - आपण केवळ वागणूक योग्य ठरवत नाही तर आपण अशा वर्तनाची पुष्टी करतो. ही गोष्ट संपूर्ण समूहाला हे दाखवून देते की भविष्यात ते असे यश कसे साजरे करू शकतात.

## 10. कंटाळया विरूध्द लढणे

यश साजरे केल्याने आपले लक्षे लंगोट बदलने किंवा 231 व्या पाठाची तयारी करणे हया सारख्या दररोजच्या गोष्टीं पासून दूर नेण्यास मदत होते. थोडक्यात का होईना परंतू आपल्या समूहाचे मन दररोजच्या ‘कंटाळ वाण्याकामा’ पासून ‘उत्सव’ करणे हयाकडे नेल्याने आपल्या संपूर्ण समूहाला नवीन सकारात्मक केंद्रबिदू प्राप्त होतो.

**आपल्या समूहाला प्रेरित ठेवण्यासाठी व ज्या गोष्टी खरंच महत्वाच्या आहेत त्यावर केंद्रित ठेवण्यासाठी यश साजरे करणे हा उत्तम मार्ग आहे.**